मंगळवार
२०
ऑक्टोबर २०२६

वर्ष १९ वे
अंक - २५५
पाने - ०४
किंमत - ४ रूपये


Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

दैनिक
युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

संपादिका : सौ. सुशीला किसन हासे (बी. ए.)
संस्थापक : किसन भाऊ हासे (बी. जे.)
कार्यकारी संपादक : सुदीप किसन हासे (एम.ई.)

RNI No. MAHMAR/2007/24252
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28

आम्ही फक्त सोनं विकत नाही, 1926 पासून विश्वास जपतो !



सण
सुवर्णाचा सन्मान
सौभाग्याचा

सुवर्णोत्सवाचा भव्य सोहळा !

१५ ऑक्टोबर ते २५ नोव्हेंबर २०२६

सोन्यावर घडणावळ केवळ
6.99% पासुन
+
खात्रीशीर मानाची
सिल्क साडी
मोफत !

आता ही सुवर्णसंधी चुकवू नका ! लवकर शोरूमला भेट द्या !

सुभाष मनाजी शहाणे
ज्वेलर्स
स्थापना १९२६
• सोने • चांदी • हिरे • मोती •

मेनरोड, उपाध्ये आश्रम समोर, संगमनेर – ४२२६०५. फोन : 9118 42 9118

॥श्रीराम॥ ® 8055 222722

संपादकीय...

टँकरमुक्त गावांचे स्वप्न प्रत्यक्षात कधी उतरणार?

पाण्यासाठी वणवण, टँकरची प्रतीक्षा आणि उन्हाळ्यात तहानलेल्या गावांची धावपळ... हे चित्र दरवर्षी दिसत असेल, तर जलसंधारणाच्या कामांचा आणि पाणी नियोजनाच्या दाव्यांचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात पाणीटंचाई हा काही नवीन विषय नाही. पावसाचे अनिश्चित प्रमाण, भूजलपातळीत होणारी घट, वाढती लोकसंख्या, पाण्याचा अमर्याद वापर आणि जलसंधारणाच्या कामांकडे होणारे दुर्लक्ष यांमुळे अनेक गावांना दरवर्षी पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. उन्हाळा सुरू झाला की विहिरी कोरड्या पडतात, बोअरवेलची पातळी खालावते आणि पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहण्याची वेळ येते. महिलांना पाण्यासाठी वणवण करावी लागते, शेतकऱ्यांच्या पशुधनाचा प्रश्न निर्माण होतो आणि गावातील दैनंदिन जीवन विस्कळीत होते. अशा परिस्थितीत टँकरमुक्त गावांचे स्वप्न प्रत्यक्षात कधी उतरणार? हा प्रश्न केवळ नागरिकांचाच नव्हे, तर प्रशासन आणि लोकप्रतिनिधींचाही कस पाहणारा आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर आणि अकोले तालुक्यांसारख्या भागांत पाणी नियोजनाला विशेष महत्त्व आहे. डोंगराळ प्रदेश, पावसाचे असमान वितरण, शेतीवरील मोठे अवलंबित्व आणि काही भागांतील पाणीटंचाई यांमुळे पाण्याचा प्रत्येक थेंब जपण्याची गरज आहे. एखाद्या गावात टँकर सुरू करणे हा तात्पुरता दिलासा असू शकतो; मात्र त्यातून पाणीटंचाईची समस्या कायमस्वरूपी सुटत नाही. टँकरने तहान भागवता येते, पण गावाची पाण्याची गरज भागवण्यासाठी शाश्वत उपाययोजना कराव्याच लागतात. प्रत्येक वर्षी पाणीटंचाई निर्माण झाल्यानंतर टँकर सुरू करणे, विहिरींचे अधिग्रहण करणे आणि पाणीपुरवठ्याचे नियोजन करणे, या उपाययोजना आवश्यक आहेत. परंतु संकट निर्माण होण्यापूर्वीच त्यावर उपाय शोधणे अधिक महत्त्वाचे आहे. पावसाळ्यात पडणारे पाणी अडविणे, ते जमिनीत मुरविणे आणि भूजलपातळी वाढविणे यासाठी गावागावांत नियोजनबद्ध प्रयत्न झाले पाहिजेत. लहान बंधारे, शेततळी, नाला खोलीकरण, सलग समतल चर, जलपुनर्भरण विहिरी आणि पाणलोट क्षेत्र विकास यांसारख्या उपाययोजनांचा योग्य वापर केल्यास पाणीटंचाईची तीव्रता कमी करता येऊ शकते. मात्र, केवळ बांधकामे करून जलसंधारणाचे उद्दिष्ट साध्य होत नाही. अनेकदा कामे झाली, निधी खर्च झाला, उद्घाटने झाली; परंतु त्यांचा दीर्घकालीन परिणाम किती झाला, याचे मूल्यमापन होत नाही. एखाद्या बंधाऱ्यात पाणी किती काळ टिकले, भूजलपातळीत किती वाढ झाली, किती क्षेत्राला सिंचनाचा लाभ झाला आणि गावाच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कितपत सुटला, याची माहिती सार्वजनिक झाली पाहिजे. जलसंधारणाच्या कामांचे यश हे केवळ खर्च झालेल्या निधीवर नव्हे, तर प्रत्यक्ष उपलब्ध झालेल्या पाण्यावर मोजले गेले पाहिजे. पाण्याच्या प्रश्नात शेतीच्या पद्धतींचाही विचार आवश्यक आहे. कमी पाण्यात येणाऱ्या पिकांना प्रोत्साहन, ठिबक आणि तुषार सिंचनाचा विस्तार, पिकांच्या गरजेनुसार पाण्याचा वापर आणि उपलब्ध जलसाठ्याशी सुसंगत पीक नियोजन यांची अंमलबजावणी झाली पाहिजे. ज्या भागात पाणी कमी उपलब्ध आहे, तेथे अधिक पाणी लागणाऱ्या पिकांचे नियोजन करताना दीर्घकालीन परिणामांचा विचार करणे आवश्यक आहे. पाणी हा अमर्याद स्रोत नसून त्यावर संपूर्ण गावाचे जीवन अवलंबून आहे, याची जाणीव प्रत्येक शेतकऱ्याला आणि नागरिकाला झाली पाहिजे. टँकरमुक्त गाव घडविण्यासाठी ग्रामपंचायतींची भूमिका निर्णायक आहे. गावातील पाण्याचे स्रोत, विहिरींची स्थिती, भूजलपातळी, पिण्याच्या पाण्याची गरज आणि उपलब्ध जलसाठा यांचा अभ्यास करून गावाचा स्वतंत्र जलआराखडा तयार केला पाहिजे. ग्रामसभेत पाण्याच्या वापराबाबत चर्चा झाली पाहिजे. पाण्याची गळती रोखणे, सार्वजनिक नळांवर होणारी नासाडी थांबविणे, पावसाचे पाणी घरांच्या छतांवरून साठविणे आणि गावातील जलस्रोतांचे संरक्षण करणे यांसारख्या छोट्या उपाययोजनाही मोठा फरक घडवू शकतात. यासाठी शासन, प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि नागरिक यांच्यात समन्वय असणे आवश्यक आहे. जलसंधारणासाठी उपलब्ध योजनांचा लाभ योग्य गावांपर्यंत पोहोचविणे, कामांची गुणवत्ता तपासणे, निधीचा पारदर्शक वापर करणे आणि पूर्ण झालेल्या कामांची देखभाल करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. लोकप्रतिनिधींनीही केवळ टँकर मंजुरीपुरते मर्यादित न राहता गावांच्या कायमस्वरूपी पाणीपुरवठ्यासाठी पाठपुरावा केला पाहिजे. पाणीटंचाईच्या काळात तातडीची मदत आणि दीर्घकालीन जलव्यवस्थापन या दोन्ही गोष्टी एकाच वेळी महत्त्वाच्या आहेत. आज हवामानातील बदल आणि पावसाचे अनिश्चित स्वरूप लक्षात घेता पाणी नियोजनाकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. पावसाचे पाणी वाहून जाऊ देऊन नंतर टँकरने तेच पाणी गावात आणण्याची वेळ येणे, ही परिस्थिती बदलली पाहिजे. प्रत्येक गावाने आपल्या पाण्याचा हिशेब ठेवला, जलस्रोतांचे संवर्धन केले आणि उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर केला, तर पाणीटंचाईवरील अवलंबित्व कमी होऊ शकते.

डॉ. जयश्रीताई थोरात यांच्या उपस्थितीत सावरगावमध्ये खेळ पैठणीचा कार्यक्रम

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - दूध व्यवसायासाठी प्रसिद्ध असलेल्या सावरगाव तळ मध्ये नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने संगमनेर तालुका युवक काँग्रेसचे अध्यक्ष डॉ.जयश्रीताई थोरात यांच्या उपस्थितीमध्ये मंगळवार दिनांक २० ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी सात वाजता खेळ पैठणीचा हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.



महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली सावरगाव तळ गावाने दूध व्यवसाय व शेती व्यवसायातून आर्थिक समृद्धी निर्माण केली आहे. या सर्व समृद्धीमध्ये महिला भगिनींचाही मोठा वाटा राहिला आहे. दिवसभर काम करून महिलांना जीवनामध्ये इतर आनंद मिळावा याकरता तरुण मित्र मंडळाच्या वतीने आयोजित नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने दांडी यांचा कार्यक्रम होणार आहे. यानिमित्ताने मंगळवारी ७ वा. डॉ.जयश्रीताई थोरात यांच्या उपस्थितीमध्ये संगमनेरी लय भारी खेळ पैठणीचा हा कार्यक्रम सुद्धा आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमांमध्ये गावातील सर्व महिला व युवती सहभागी होणार आहेत या कार्यक्रमासाठी मंदिर परिसरामध्ये सुशोभीकरणासह विद्युत रोषणाई करण्यात आली आहे त्यामुळे एक नवचैतन्य निर्माण झाले आहे. तरी खेळ पैठणीचा या कार्यक्रमासाठी परिसरातील सर्व महिला,युवक,युवती व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन तरुण मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

हरिष दिमोटेंना स्व. अशोकराव तुपे पत्रकारिता पुरस्कार जाहीर

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर- पत्रकारिता ही केवळ बातमी देण्याचे माध्यम नसून, समाजातील प्रश्नांना वाचा फोडणारी, अन्यायाविरुद्ध आवाज उठवणारी आणि लोकशाही अधिक बळकट करणारी महत्त्वाची शक्ती आहे.



अशाच पत्रकारितेच्या क्षेत्रात लेखणीच्या आणि कर्तृत्वाच्या जोरावर उल्लेखनीय योगदान देणारे न्यूज १८ मराठीचे अहिल्यानगर जिल्हा प्रतिनिधी हरीष दिमोटे यांना स्व. अशोकराव तुपे पत्रकारिता पुरस्कार जाहीर झाला आहे.. लोकहक्क फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दिला जाणारा हा पुरस्कार ज्येष्ठ आणि अभ्यासू पत्रकारांच्या कार्याचा गौरव करणारा आहे. संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष लहू कानडे यांच्या पुढाकारातून आयोजित या पुरस्कार सोहळ्यात पत्रकारितेतील उल्लेखनीय योगदानाची दखल घेतली जात आहे.

हरीष दिमोटे यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून जनसामान्यांचे प्रश्न, सामाजिक विषय आणि परिसरातील महत्त्वाच्या घडामोडींना सातत्याने वाचा फोडण्याचे काम केले आहे. त्यांच्या या कार्याचा गौरव म्हणून त्यांची या पुरस्कारासाठी निवड होणे ही निश्चितच अभिमानाची बाब आहे. शनिवार, दिनांक २४ ऑक्टोबर २०२६ रोजी, दुपारी १ वाजता, लोकहक्क फाउंडेशन संचलित संशोधन, प्रशिक्षण आणि विकास अकादमी, सराला, श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर येथे हा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होत आहे.

ज्ञानमाता विद्यालयात कुमारिका पूजन उपक्रम उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर येथील ज्ञानमाता विद्यालयामध्ये पंकज ज्वेलर्स यांच्या वतीने नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून १३ ऑक्टोबर रोजी ज्ञानमाता विद्यालयात 'कुमारिका पूजन' (कन्यापूजन) सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला.

नवरात्रीमध्ये लहान मुलींना आदिशक्ती दुर्गामातेचे रूप मानून त्यांचा आदर-सत्कार करण्याची हिंदू धर्मात मोठी परंपरा आहे. सदर कार्यक्रम घेण्यामागे स्त्री हे आदिशक्तीचे रूप आहे, त्यांच्याविषयी सर्वांमध्ये आणि तरुण पिढीच्या मनात आदर आणि सन्मानाची भावना वृद्धिंगत व्हावी या उद्देशाने सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यालयातील एकूण दहा विद्यार्थिनींनी विविध देवींच्या वेशभूषा परिधान केल्या. त्यांचे विधिवत पूजन करण्यात आले. सदर कार्यक्रमादरम्यान मातोश्री रू.दा मालपाणी विद्यालयातील माजी शिक्षक श्री चंद्रशेखर कानडे सरांनी, विद्यार्थिनींनी शिक्षण घेताना कर्तृत्वान व उत्कृष्ट जीवन कसे घडवावे, याविषयी सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पंकज ज्वेलर्स यांच्या सौजन्याने, सामाजिक बांधिलकी जोपासत सर्व विद्यार्थ्यांना लाडूचे वाटप केले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयातील शिक्षिका श्रीमती तेजश्री फटांगरे मॅडम यांनी केले तसेच याप्रसंगी विद्यालय व जुनिअर कॉलेजचे प्राचार्य फादर फ्रान्सिस पटेकर, उपप्राचार्या अर्चना डोंगरे मॅडम, पर्यवेक्षक फादर प्रशांत शहाराव व सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

सुकेवाडीच्या कान्होबा देवस्थानात नवरात्रोत्सव

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील सुकेवाडी येथे वसलेले श्री कान्होबा उर्फ कानिफनाथ महाराज देवस्थान हे महाराष्ट्रातील सातवे महत्त्वाचे नाथ सिद्धपीठ मानले जाते. ग्रामीण भागातील भक्तीभाव परंपरा आणि नाथसंप्रदायाची साधना यांचे सुंदर दर्शन येथे घडते सालाबाद प्रमाणे सुकेवाडी ग्रामस्थांनी याही वर्षी मोठ्या उत्साहात कान्होबा देवस्थानात नवरात्री उत्सव खूप छान पद्धतीने साजरा केला.. ५ व्या दिवशी भाविक भक्तांन साठी महाप्रसाद देण्यात येतो.. प्रत्येक दिवशी दांडिया खेळ होतो.. देवस्थानात हिंदू रिती रिवारजनुसार दररोज श्री कान्होबा देवाच्या समाधीची अत्यंत श्रद्धेने पूजा केली जाते. समाधीला स्वच्छ पाण्याने स्नान घालून गंध , हार फुले अर्पण केली जातात. सकाळची आरती गणपती बाप्पा, दत्त महाराज, कान्होबा देव, नवनाथ आरती सकाळी ६ वाजता तर सायंकाळची आरती सायंकाळी ७ : ३० वाजता होते. त्याचबरोबर गुरुवारी विशेष महाआरती होऊन महाआरतीनंतर महाप्रसादाचे वाटप होते. ही परंपरा गावकऱ्यांनी पिढ्यानपिढ्या जपली आहे. देवस्थानातील सर्व पूजा सुकेवाडी गावातील ग्रामस्थांच्या सहभागातूनच पार पडते. देवस्थानासाठी गावकऱ्यांनी अधिकृत हिंदू पुजारी नेमले असून आकाश शशिकांत सातपुते सुकेवाडी अशोक महादू खर्डे सुकेवाडी हे दोघेही नित्य पूजा व धार्मिक विधी पार पाडत आहेत. नित्य पूजेसाठी लागणाऱ्या वस्तू व खर्च दररोजच्या पूजेसाठी हार,कापूर, तूप, तेल, गुलाबजल, अत्तर, अष्टगंध, चंदन, धूप, कापूस,



वाती, भस्म, खडीसाखर, अशा विविध वस्तूंचा वापर केला जातो. ऑक्टोबर २०२६ महिन्यातील ३१ दिवसांसाठी या सर्व वस्तूंचा एकूण खर्च सुमारे ३००० रुपये इतका झाला असून हा खर्च सुकेवाडी गावातील ग्रामस्थ नाथसेवेकरी भास्कर आप्पाची सातपुते, राजेंद्र बाजीराव कुटे, रवींद्र रामनाथ गुंजाळ, बाळासाहेब रंगनाथ सातपुते, वैभव बाबासाहेब सातपुते,सुकेवाडी यांनी वस्तू स्वरूपाने उचलला आहे दर पौर्णिमेला देवस्थानात होम - हवंनाचे आयोजन केले जाते. या होमासाठी श्रीफळ, तूप, साखर, सुपारी, बदाम, हळकुंड, खारीक, खोबरे, काळे तीळ, सातू, गुगळे, धूप, पेढे, गहू, तांदूळ, पंचामृत, फुले, फळे, आधी वस्तूंचा समावेश होतो. या सर्वांचा एकूण खर्च सुमारे ४००० रुपये असून हा खर्च सुकेवाडी गावातील ग्रामस्थ नाथसेवेकरी राहुल राजू वामन, सुरेश लहाने घोडेकर, महेश प्रदीप वर्पे, केशवराव माधव जाधव, नागेश दामू गुंजाळ,यांनी वस्तू स्वरूपाने केला आहे. सुकेवाडीतील हे नाथ सिद्ध पीठ केवळ धार्मिक स्थळ नसून गावकऱ्यांच्या एकोप्याचे आणि श्रद्धेचे प्रतीक आहे. नित्य पूजा पौर्णिमेचे होम - हवन गुरुवारची महाआरती आणि महाप्रसाद या माध्यमातून येथे भक्तीची अखंड ज्योत तेवत ठेवली जात आहे..

मालपाणी विद्यालयात कुमारिका पूजन



युवावार्ता (प्रतिनिधी)

येथील मातोश्री रु. दा. मालपाणी विद्यालयात नवरात्रोत्सवाच्या नवव्या माळेनिमित्त कुमारिका पूजनाचा कार्यक्रम भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. यावेळी नवदुर्गांच्या वेशभूषेतील बालिकांचे विद्यालयातील शिक्षिकांकडून औक्षण करून पूजन करण्यात आले. या प्रसंगी शारदा शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा सुवर्णाताई मालपाणी, कार्यकारिणी सदस्या रचना मालपाणी, सचिव सतिश लाहोटी, पंकज ज्वेलर्सचे विनायक नागरे व परिवार, सेवानिवृत्त शिक्षक चंद्रशेखर कानडे, विद्यालयाचे मुख्याध्यापक उत्तम एरंडे, पर्यवेक्षिका रंजना पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सेवानिवृत्त शिक्षक चंद्रशेखर कानडे यांनी केले. आपल्या संक्षिप्त मनोगतात त्यांनी कुमारिका पूजनाचे धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व विशद केले. कुमारिकेमध्ये देवीचे स्वरूप पाहून तिचा सन्मान करणे, हा या पूजनामागील उदात्त भाव असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच नवरात्रोत्सवात पूजल्या जाणाऱ्या नवदुर्गांच्या नऊ रूपांची माहिती देऊन प्रत्येक रूपातून प्रकट होणाऱ्या शक्ती, धैर्य, भक्ती आणि ज्ञान या गुणांचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. यानंतर त्यांनी 'पाहुणी आली घरा' आणि 'अंबाबाई लाडं लाडं' ही गीते वाद्यवृंदाच्या साथीने सादर केली.

यानंतर विद्यालयाच्या गीतमंचाने विनायक हिरे यांच्या साथीने 'महिषासुरमर्दिनी स्तोत्र' सादर केले. स्तोत्राच्या मंगलमय स्वरांत रचना मालपाणी तसेच विद्यालयातील शिक्षिकांनी नवदुर्गांच्या वेशभूषेतील कुमारिकांचे औक्षण करून पूजन केले. रचना मालपाणी यांनी आपल्या मनोगतातून नवदुर्गांची विविध रूपे, देवीची शक्ती आणि स्त्रीशक्तीचे महत्त्व स्पष्ट केले. बालिकांमध्ये दडलेल्या सामर्थ्याला प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सन्मान करणे ही समाजाची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. कुमारिकांचे तसेच उपक्रमासाठी परिश्रम घेणाऱ्या शिक्षकांचे त्यांनी कौतुक केले. विद्यालयात आणि संगमनेर शहरातील विविध शाळांमध्ये मागील तेरा वर्षांपासून अव्याहतपणे कुमारिका पूजनाचा उपक्रम राबविल्याबद्दल त्यांनी चंद्रशेखर कानडे यांचे विशेष अभिनंदन केले. यानंतर सामूहिकरित्या 'दुर्गे दुर्गट भारी' ही आरती करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंबादास बुलाखे, औक्षण संचालन आरती कुलकर्णी यांनी केले, तर उपस्थितांचे आभार रंजना पवार यांनी मानले. शेवटी सर्व विद्यार्थ्यांना लाडू प्रसादाचे वाटप करण्यात आले.

दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता
०२४२५ २२५१२९

पाहिजेत
मे.साईराज सेल्स कॉर्पोरेशन
Exide battery sales & services (Sangamner)
कॉम्प्युटर ऑपरेटर - १ जागा
(टॅलीचे ज्ञान आवश्यक)
बॅटरी विषयी माहिती असलेला - 1जागा
संपर्क क्रमांक:
9822312490

पाहिजेत
ध्येय फायनान्स संगमनेर
Branch manager BM-1
Branch devlopment Menegar BDM- 1
Sales devlopment MenegarSDM - 1
Telicaller - 2 M/F
कार्यालय - युवा ध्येय, विठ्ठल स्मृती कॉम्प्लेक्स, अकोले रोड, संगमनेर
फोन (०२४२५)२६१८७२
9370773504
7768079272

भाड्याने देणे आहे
टॉप टेन इम्पेरिअल (रिलायन्स डिजीटल) मध्ये ग्राउंड फ्लोअरचे दोन शॉप किंवा ऑफिस भाड्याने देणे आहे
- संपर्क -
9730380303
9552690909

२ बीएचके फ्लॅट्स उपलब्ध!
पत्ता
SBI कॉलनीजवळ, जनता नगर, संगमनेर
संपर्क क्रमांक:
9850569862
9834825883

पाहिजेत
अकाऊंटंट - 2 जागा
कॅशिअर - 2 जागा
सेल्समन - १० जागा (पु.)
सेल्समन - १० जागा (म.)
वॉचमन - २ जागा
आकर्षक पगार दिले जाईल
मुळचंद होलसेल मिल डेपो
अकोले रोड, सेलिब्रेश हॉटेल समोर, संगमनेर
7498901766

पाहिजेत
सेल्समन - ४ जागा
अकाऊंटंट - १ जागा
मॅनेजर - १ जागा
(अनुभवास प्राधान्य)
आकर्षक पगार दिले जाईल
मैड सराफ ॲण्ड सन्स
नेहरूचौक, संगमनेर
9850530266





मांडवे बुद्रुकमध्ये चोरट्यांचा धुमाकूळ

१ लाख १८ हजारांचा ऐवज लंपास



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील मांडवे बुद्रुक येथील वाडेकर वस्तीवर मध्यरात्री चोरट्यांनी धुमाकूळ घालत दोन घरांना लक्ष्य केले. बंद घरांचे दरवाजे तोडून घरात प्रवेश करत चोरट्यांनी सोन्याचे दागिने आणि रोख रकमेसह एकूण १ लाख १८ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरून नेला. ही घटना शनिवारी (१७ ऑक्टोबर) रोजी पहाटे तीन ते चार वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

याबाबत घारगाव पोलीस ठाण्यात दाखल फिर्यादीनुसार मांडवे बुद्रुक येथील वाडेकर वस्तीवर राहणारे संतोष धोंडीभाऊ वाडेकर हे कुटुंबासह शेती व्यवसाय करून उदरनिर्वाह करतात. शुक्रवारी रात्री कुटुंबातील सर्वजण जेवण करून झोपी गेले होते. मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी घराच्या दरवाजाचा कडी-कोयंडा तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर संतोष वाडेकर यांच्या वडिलांच्या कपडचाच्या खिशातील १० हजार रुपये रोख रक्कम चोरली. तसेच घरातील लाकडी कपाट उचकटून त्यातील एक तोळा वजनाचे सोन्याचे मिनी गंठण आणि आठ हजार ५०० रुपये रोख रक्कम असा ऐवज लंपास केला. तसेच याच परिसरात राहणारे लहानु बाजीराव डोलनर यांच्या घरालाही चोरट्यांनी लक्ष्य केले. डोलनर यांच्या पत्नी ठकुबाई यांच्या

गळ्यातील एक तोळा वजनाचे सोन्याचे मणी मंगळसूत्र चोरट्यांनी बळजबरीने ओढून तोडून नेल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. या घटनेत वाडेकर यांच्या घरातून ५० हजार रुपये किमतीचे सोन्याचे गंठण आणि १८ हजार ५०० रुपये रोख, तर डोलनर यांच्या घरातून ५० हजार रुपये किमतीचे मणीमंगळसूत्र चोरीला गेले. एकूण १ लाख १८ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरीस गेला आहे. डोलनर दाम्पत्याने चोरट्यांना पाहिले असून, ते तीन जण होते आणि त्यांनी चेहऱ्याला काळे कापड बांधले होते, अशी माहिती फिर्यादीत देण्यात आली आहे.

या प्रकरणी संतोष वाडेकर यांनी घारगाव पोलीस ठाण्यात तीन अज्ञात चोरट्यांविरुद्ध फिर्याद दिली आहे. पहाटेच्या सुमारास दोन घरांमध्ये झालेल्या या चोरीमुळे मांडवे बुद्रुक परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. चोरट्यांचा शोध घेऊन चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्याचे आव्हान घारगाव पोलिसांसमोर आहे.

भंडारदरा, निळवंडेचे आवर्तन बंद करा

अन्यथा चाक बंद; कृती समितीचा इशारा

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - भंडारदरा व निळवंडे धरणांतून पिण्यासाठी आणि शेतीसाठी आतापर्यंत किती पाणी सोडले? तसेच आगामी काळात अकोले तालुक्याला किती पाणी मिळणार? याचा सविस्तर तपशील उपलब्ध करून द्यावा, तसेच सुरू असलेले आवर्तन तात्काळ बंद करा अन्यथा निळवंडे धरणाचे सोमवारी चाक बंद करणार, असा इशारा पाणी बचाव कृती समितीच्या वतीने अकोले तालुका सर्वपक्षीय कार्यकर्त्यांच्या बैठकीत घेण्यात आला.



शनिवारी अकोलेत डॉ. किरण लहामटे, शिंदेसेनेचे बाळासाहेब भोर, उद्धवसेनेचे महेश नवले, भाजपचे जालिंदर वाकचौरे यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी (अजित पवार), राष्ट्रवादी (शरद पवार), उद्धवसेना, शिंदेसेना, मनसे, भाजप आदी सर्व पक्षीय कार्यकर्त्यांची सहविचार सभा झाली. या बैठकीत चाकबंद आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला.

आमदार डॉ. किरण लहामटे यांनी पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता स्वप्नील काळे यांना पत्र दिले आहे. भंडारदरा आणि निळवंडे धरणे चालू वर्षात कोणत्या तारखेला पूर्ण क्षमतेने भरली, त्यानंतर नदीपात्रातून आणि कालव्यांमधून पिण्याच्या पाण्यासाठी व सिंचनासाठी आजपर्यंत किती पाणी सोडण्यात आले, याची माहिती मागितली आहे.

नियमांनुसार प्रवरा नदीचे पाणी कोणत्या कालावधीत सोडणे अपेक्षित होते, प्रत्यक्षात आतापर्यंत किती पाणी सोडण्यात आले आणि त्याचे नियोजन कोणत्या पद्धतीने करण्यात आले, याचा खुलासाही त्यांनी पत्रात मागितला आहे.

धरणांच्या पाण्याच्या नियोजनात अकोले तालुक्याच्या हक्काच्या पाण्याला प्राधान्य मिळावे, अशी भूमिका आमदार डॉ. लहामटे यांनी मांडली. पाण्याच्या नियोजनाबाबत स्पष्टता न मिळाल्यास अकोले तालुक्यात आंदोलन छेडण्यात येईल व त्यास प्रशासन जबाबदार राहील, असा इशाराही दिला आहे.

टायगर श्रॉफवरील हल्ल्याप्रकरणी तीन संशयित कोटामधून ताब्यात

मुंबई -टायगर श्रॉफच्या गाडीवर झालेल्या गोळीबार प्रकरणी कोटा पोलिसांनी पुणे-जयपूर एक्सप्रेसमधून तीन संशयितांना ताब्यात घेतले आहे. कोटाच्या पोलीस अधीक्षक, तेजस्विनी गौतम यांनी सांगितले, हे तिघे दिल्लीमार्गे जयपूरमार्गे नेपाळला पळून जाण्याचा प्रयत्न करत होते. मुंबई पोलिसांकडून माहिती मिळाल्यानंतर, कोटा पोलिसांनी ट्रेनची झडती घेतली आणि अवघ्या १५ मिनिटांत तिघांनाही पकडले.

या तीन संशयितांपैकी दोघे हरियाणाचे आणि एक बिहारचा आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, त्यापैकी दोघे गोळीबारात सहभागी होते. मुंबई पोलिसांच्या माहितीनुसार, गोळीबारानंतर आरोपींनी अंधेरी पश्चिम रेल्वे स्टेशनजवळ आपली बाईक सोडून दिली आणि बोरिवलीला जाणाऱ्या ट्रेनमध्ये चढले. ही बाईक जप्त करण्यात आली आहे.

टायगरला गोळी लागली नाही, परंतु बंदुकीच्या दारूगोळ्यामुळे आणि काचेच्या तुकड्यांमुळे त्याचा डावा हात जखमी झाला. या गोळीबारात त्याचा ड्रायव्हरही जखमी झाला. सायंकाळी ७ वाजता तीन जणांनी टायगरच्या गाडीवर गोळीबार केला. लॉरेन्स गँगने याची जबाबदारी स्वीकारली आहे. गेल्या चार वर्षांत सलमान खानसह आठ अभिनेते आणि गायकांवर हल्ले झाले आहेत.कोटाच्या एसपी तेजस्विनी गौतम म्हणाल्या, ते पुणे-जयपूर एक्सप्रेसच्या जनरल कोचमधून पळून गेले. ते सकाळी १०:३० वाजता कोटा येथे पोहोचले आणि तेथे त्यांना ताब्यात घेण्यात आले.कोटाच्या एसपी तेजस्विनी गौतम म्हणाल्या, घटनेनंतर ते लगेचच निघून गेले. त्यांची योजना अशी होती की, आधी ट्रेनने जयपूरला, मग बसने दिल्लीला पोहोचायचे आणि त्यानंतर नेपाळला जायचे.

विद्यार्थी हेच घरातील सीसीटीव्ही कॅमेरे- डॉ. संध्या खेडेकर

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सुरक्षिततेसाठी आज प्रत्येक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवले जात आहे. सार्वजनिक ठिकाणी तर सावधान! आपल्यावर तिसऱ्या डोळ्याची नजर आहे असेही फलक बघायला मिळतात. आजचे विद्यार्थीही एक प्रकारचे सीसीटीव्ही कॅमेरेच आहेत असे प्रतिपादन शहरातील गोखले एज्युकेशन सोसायटीचे एस एम आर के महिला कनिष्ठ महाविद्यालयात संस्थेच्या सचिव डॉ दीप्ती देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित शिक्षक पालक सभेच्या अध्यक्ष स्थानावरून बोलताना प्राचार्या डॉ संध्या खेडेकर यांनी व्यक्त



केले. डॉ खेडेकर पालकांशी संवाद साधताना पुढे म्हणाल्या की, पालक घरात जसे वागतात त्याप्रमाणेच विद्यार्थीही (पाल्य) अनुकरण करत असतात. पालकांनी विद्यार्थ्यांच्या अभ्यासाकडे लक्ष देण्याऐवजी पालकच तासंतास मोबाईलवर व्यस्त असल्याचे वास्तव सगळीकडेच बघायला मिळत आहे. त्यामुळे विद्यार्थीही घरातील व्यक्तींचे अनुकरण करून मोबाईल हाताळताना दिसून येत आहे. पालकांनीच आता विद्यार्थ्यांना मोबाईलचा वापर कमी करून अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्याची वेळ आली आहे अशी खंत यावेळी प्राचार्या डॉ खेडेकर यांनी व्यक्त केली. याप्रसंगी शैक्षणिक वर्ष २०२६ /२७ साठी शिक्षक पालक संघाची कार्यकारणी निवडण्यात आली ती पुढील प्रमाणे- अध्यक्ष प्राचार्या डॉ संध्या खेडेकर, उपाध्यक्ष अवंती पुजारी, सचिव सौ शोभा सुरोशे, सहसचिव बी के जाधव, समन्वयक शोभा त्रिभुवन, तर सदस्य म्हणून अनिल पाटोळे, नितीन कोचर, सौ सुप्रिया जगताप यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. नवनिर्वाचित सर्व सदस्यांचे स्वागत व सत्कार प्राचार्या सौ खेडेकर यांनी केले. यावेळी पालक प्रतिनिधी अवंती पुजारी, अनिल पाटोळे, सौ जडे यांनीही विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी काही सूचना केल्या तसेच फक्त सर्व पालकांचा मोबाईल ग्रुप करावा असे आवाहन नितीन पाटोळे यांनी उपस्थित पालकांच्या वतीने केले. प्रास्ताविक समन्वयक शोभा त्रिभुवन, फी तक्ता वाचन वरिष्ठ लिपिक संजय येवलेकर यांनी केले. सौ शोभा सुरोशे यांनी सूत्रसंचालन करून सौ योगिनी जोशी यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

आदरणीय सुवर्णा काकी मालपाणी वाढदिवस अभीष्टचिंतन

प्रिय बाई, ७५ व्या वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

बाई, तुझा वाढदिवस आम्ही साजरा करणे म्हणजे ज्योतीने साक्षात तेजाची आरती केल्यासारखे आहे! तुझ्यासारख्या ज्ञान, संस्कार, कर्तृत्व आणि प्रेमाने समृद्ध व्यक्तिमत्त्वाचा गौरव करण्यासाठी शब्दही अपुरे पडतात.

तुझी पंचाहत्तरी संपूर्ण परिवाराने भव्य स्वरूपात साजरी करावी, अशी आमची मनापासून इच्छा होती. मात्र, तुला वाढदिवसाचे मोठे सोहळे फारसे आवडत नाही म्हणून शब्दांतूनच तुझ्याविषयीचे प्रेम आणि आदर व्यक्त करीत आहे..तुझ्या व्हॉट्सप डीपीवरील फोटो पाहिला की मन प्रसन्न होते. तुझ्या चेहऱ्यावरील तेज आणि सौंदर्य पाहून तू पंचाहत्तरीची झाली आहेस, यावर विश्वासच बसत नाही!

आज तुझ्या वाढदिवसानिमित्त बालपणीच्या आठवणी मनात दाटून येतात. मी, गिरीश, आशिष, मिलिंद आणि सचिन असे आम्ही सगळे जुन्या घरी राहायचो. शैला काकी आणि विजूकाकाही सोबत असायचे. गल्लीमध्ये खेळणे, पतंग उडवणे आणि मनसोक्त मस्ती करणे, हे आमचे रोजचे आयुष्य होते. पण तुझा दरारा इतका होता की तुझा आवाज ऐकताच आम्ही सगळे सावध व्हायचो! आज त्या आठवणी आठवल्या की हसू येते; पण त्या धाकामागे आमच्याविषयीची काळजी आणि आम्हाला शिस्त लावण्याची तुझी तळमळ होती, हे आता प्रकर्षाने जाणवते. लहानपणी अनेक जण मला विचारायचे, तुझ्या पप्पांनी आंतरजातीय विवाह केला आहे का? कारण इतर घरांमध्ये मारवाडी भाषा बोलली जायची, पण तू इतके अस्खलित आणि सुंदर मराठी बोलायचीस की लोकांना आश्चर्य वाटायचे!आमचा अभ्यास घेणे, शिक्षणाकडे लक्ष देणे आणि योग्य संस्कार करणे, यात तू नेहमीच पुढे असायचीस. राजगुरुनगरसारख्या छोट्या गावातून येऊनही तू जिद्द, मेहनत आणि कर्तृत्वाच्या जोरावर स्वतःचे व्यक्तिमत्त्व घडवलेस. दादीची मनापासून केलेली सेवा, महिला मंडळातील सहभाग, सामाजिक व महेश टॉमच्या सांस्कृतिक कार्यक्रमांतील पुढाकार आणि विविध स्पर्धांमध्ये मिळवलेली बक्षिसे, हे तुझ्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवतात. माझे आणि रचनाचे लग्न झाल्यानंतर मोठी सून म्हणून तू रचनाला प्रेमाने मार्गदर्शन केलेस. जय अवघ्या तीन वर्षांचा असताना आम्ही अमेरिकेला गेलो आणि तो तुझ्या सहवासात राहिला. त्या काळात तू त्याच्याकडून तीसपेक्षा अधिक पाढे म्हणून घेतलेस, त्याला अनेक गोष्टी शिकवल्यास आणि त्याच्या शिक्षणाचा पाया भक्कम केलास. आज जयच्या जडणघडणीत तुझ्या प्रेमाचा, संस्कारांचा आणि मार्गदर्शनाचा मोठा वाटा आहे. मुलाचे आयुष्य घडवण्यात तू दिलेले योगदान आम्ही कधीच विसरू शकणार नाही. तुझा मधुर गायनाचा आवाज आणि संस्कृतवरील प्रभुत्व हे तुझ्या व्यक्तिमत्त्वाचे आणखी दोन सुंदर पैलू आहेत. तुझा सुरेल आवाज ऐकताना तो



पंचाहत्तरीच्या महिलेचा आहे, यावर विश्वास बसत नाही.

गीता परिवाराच्या माध्यमातून तू केलेले कार्य म्हणजे तुझ्या आयुष्यातील एक महान तपश्चर्या आहे. गीतेचे कठीण अध्याय आणि अवघड संस्कृत श्लोक तू इतक्या सहज, सुंदर आणि शास्त्रशुद्ध पद्धतीने शिकवतेस की ते समजणे आणि पाठ करणे सोपे होते. भारतातच नव्हे, तर परदेशांतील अनेक घरांमध्येही तुझा आवाज दररोज सकाळी गीतेच्या श्लोकांतून घुमतो. तुझ्या या कार्यातून असंख्य लोकांपर्यंत ज्ञान, भक्ती आणि जीवनमूल्ये पोहोचत आहेत. तुझ्या या अमूल्य योगदानाला मनापासून वंदन! तुझे मोत्यांसारखे सुंदर, वळणदार हस्ताक्षर आणि उत्तम शुद्धलेखन हेही तुझ्या विद्वत्तेचे प्रतीक आहे. भाषेवरील प्रभुत्व, अभ्यासू वृत्ती आणि प्रत्येक गोष्टीतील अचूकता तुझ्या व्यक्तिमत्त्वाला एक वेगळीच उंची देतात. मैत्रिणींवरील तुझे प्रेम, सहलींचे आयोजन करून सर्वांना एकत्र आणण्याची तुझी वृत्ती आणि प्रत्येकाची काळजी घेण्याचा स्वभाव खरोखर कौतुकास्पद आहे. स्वयंपाकापासून अनेक विषयांपर्यंतचे तुझे ज्ञान, परखड मते, ठाम विचार आणि प्रसंगावधान हे तुझे विशेष गुण आहेत. आम्हा पाचही भावांची प्रगती पाहून तुला होणारा आनंद आमच्यासाठी खूप मोलाचा आहे.

बाई, आज आम्ही आयुष्यात अनेक मोठे प्रोजेक्ट्स उभे केले, अनेक स्वप्ने साकार केली. पण जेव्हा तू आमच्या कार्यक्रमांना उपस्थित राहतेस, आमचे काम पाहून भरभरून कौतुक करतेस, पाठीवर कौतुकाची थाप देतेस आणि आशीर्वाद देतेस, तेव्हा आम्हाला विलक्षण कृतकृत्य झाल्यासारखे वाटते. तुझ्या डोळ्यांत दिसणारे समाधान आणि चेहऱ्यावरचा अभिमान आमच्यासाठी कोणत्याही पुरस्कारापेक्षा मोठा असतो. त्या एका क्षणात प्रोजेक्टचा सारा थकवा नाहीसा होतो आणि यापेक्षाही मोठी कामे करण्याची नवी ऊर्जा व प्रेरणा मिळते. कारण आम्ही केलेले काम पाहून आपल्या माणसांच्या डोळ्यांत समाधान दिसणे आनंददायी असतेच; पण ते समाधान तुझ्या डोळ्यांत पाहणे, ही आमच्यासाठी खऱ्या अर्थाने यशाची पावती आहे. व आज मागे वळून पाहताना जाणवते की तू आमच्या बालपणापासूनच्या जडणघडणीचा एक महत्त्वाचा आधार राहिली आहेस. तुझ्या शिस्तीतून आम्ही शिकलो, तुझ्या मार्गदर्शनातून घडलो आणि तुझ्या प्रेमातून नात्यांचे महत्त्व समजलो. माणसाचे मोठेपण त्याच्या वयात नसते, तर त्याने किती माणसे घडवली, किती नाती जपली आणि आपल्या ज्ञानाने किती आयुष्ये समृद्ध केली, यात असते. या प्रत्येक बाबतीत तू आमच्यासाठी एक आदर्श आहेस.

आणि शेवटी, प्रिय बाई, मनापासून एक गोष्ट सांगावीशी वाटते लहानपणी तुझ्या आवाजाने आम्ही खेळातून पळत घरी यायचो; आज मात्र तुझा आवाज ऐकण्यासाठी मन आतुर असते. तेव्हा तुझ्या धाकाने शिस्त शिकलो; आज तुझ्या संस्कारांतून आयुष्याचा खरा अर्थ समजतो. काळ बदलला, वय वाढले; पण तुझ्याविषयीचे प्रेम आणि आदर कधीच कमी झाला नाही. तू आमच्यासाठी केवळ बाई नाहीस; तू आमच्या बालपणीच्या आठवणी, आमच्या संस्कारांचा पाया, आमच्या कुटुंबाला जोडणारा प्रेमाचा धागा आणि आमच्या आयुष्याला दिशा देणारा दीपस्तंभ आहेस. तुझ्यासारखी व्यक्ती आमच्या आयुष्यात आहे, हेच आमचे भाग्य! आज तुझ्या पंचाहत्तरीच्या निमित्ताने परमेश्वराच्या चरणी प्रार्थना करतो की तुला उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, मनःशांती आणि अखंड आनंद लाभो. तुझ्या चेहऱ्यावरील हास्य असेच कायम राहो आणि तुझ्या ज्ञानाचा व मधुर आवाजाचा लाभ असंख्य लोकांना मिळत राहो. बाई, तू शंभरी पार करावीस आणि त्या दिवशीही आम्हा सर्वांना तुझ्या भोवती जमून तुझा वाढदिवस साजरा करण्याचे भाग्य लाभो, हीच मनापासून प्रार्थना! तुझ्या पंचाहत्तरीचा हा सोहळा म्हणजे केवळ वयाचा उत्सव नाही; तो तू घडवलेल्या पिढ्यांचा, जपलेल्या नात्यांचा आणि तुझ्या ज्ञानाने उजळलेल्या असंख्य आयुष्यांचा गौरव आहे.

प्रिय बाई, तुला पंचाहत्तरीच्या कोटी कोटी शुभेच्छा! तुझ्या चरणी साष्टांग प्रणाम. तुझी माया, तुझे प्रेम आणि तुझा आशीर्वाद आमच्या पाठीशी सदैव राहो!

तुझाच मनीष..



मनिष मालपाणी

संचालक, मालपाणी उद्योग समुह, संगमनेर

शेतकरी संरक्षण कायदा काळाची गरज - अण्णा हजारे



युवावार्ता (प्रतिनिधी)

नेवासा - शेतकरी संरक्षण कायदा ही काळाची गरज आहे, असे मत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांनी व्यक्त केले. राळेगणसिद्धी येथे पद्मविभूषण अण्णा हजारे यांच्यासमवेत माजी कुलगुरू डॉ. अशोकराव ढगे, प्रदेशाध्यक्ष अशोकराव सब्बन, ज्येष्ठ भ्रष्टाचार विरोधी नेते रामराव भदगले व नेवासा तालुका उपाध्यक्ष कल्याणराव मुरूमकर यांनी शेतकरी संरक्षण कायदा मसुदा २०२६ यावर अभ्यासपूर्ण चर्चा केली. त्याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी अण्णा हजारे म्हणाले, शेतकरी संरक्षण कायदा ही काळाची गरज आहे, कारण सध्या शेतकरी खूप मोठ्या संकटातून शेती करत आहे. प्रदेशाध्यक्ष अशोकराव सब्बन यांनी शेतकऱ्यांच्या पूर्वमशागती व पेरणी पासून थेट पीक कापणी पर्यंत सर्व घटकांचा विचार करून शेतकरी संरक्षण कायदा २०२६ चा मसुदा तयार करण्यात आला असल्याचे सांगितले. डॉ. ढगे म्हणाले, जगातील प्रगत देशांत शेतकऱ्यांना संरक्षण देण्यासाठी उत्तम प्रतीचे कायदे आहेत. अमेरिकेत इरमा, इजराइल मध्ये ॲग्रोस्को तसेच इतर राष्ट्रात शेतकऱ्यांना संरक्षण दिले जाते. शेतकऱ्यांना सर्पदंश, जंगली डुक्कर व बिबट्यांपासून मृत्यू, ढगफुटी, ओला दुष्काळ व कोरडा दुष्काळ या मोठ्या संकटातून संवर्धन करणे व त्या अनुषंगाने संरक्षण कायदा असला पाहिजे.

शेतकरी संरक्षण कायद्याच्या मसुद्याची प्रत कल्याणराव मुरूमकर व रामराव भदगले यांच्या हस्ते अण्णांकडे सुपूर्द करण्यात आली. सदरचा मसुदा राज्याचा कायदा म्हणून आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून मंजूर करून घ्यावा अशी अपेक्षा यावेळी कार्यकर्त्यांनी अण्णा हजारे यांच्याकडे व्यक्त केली. अण्णांचे सहाय्यक अन्सार शेख यांनी या संदर्भातील कार्यवाहीचा पाठपुरावा करण्याची जबाबदारी स्वीकारली.

राज्याला पुन्हा अवकाळीचा इशारा

अहिल्यानगर - नैऋत्य मोसमी पावसाने देशातून माघार घेतली असली, तरी महाराष्ट्रातील काही भागांत पुन्हा अवकाळी पावसाचे संकट निर्माण होण्याची शक्यता आहे. बंगालचा उपसागर आणि अरबी समुद्रात हवामान प्रणाली विकसित होण्याचे संकेत मिळत असून, राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये वादळी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. १९ ऑक्टोबर रोजी १३ जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला असून, अहिल्यानगरसह अन्य काही जिल्ह्यांतही हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.

भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सातारा, पुणे, सांगली, सोलापूर, बीड, धाराशिव, लातूर, नागपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांत १९ ऑक्टोबर रोजी पावसाची शक्यता आहे. या भागांत विजांच्या कडकडाटासह सोसाट्याचे वारे वाहण्याचा अंदाज असल्याने नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे. अहिल्यानगर, परभणी, हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यांतही काही ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस पडू शकतो. २० ऑक्टोबर रोजी रायगड, पुणे, सातारा, बीड आणि परभणी जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सांगली, सोलापूर, धाराशिव आणि लातूरसह नांदेड जिल्ह्यातील काही भागांत वादळी पावसाचा अंदाज आहे.



दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

RNI No. MAHMAR/2007/24252

तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28



मंगळवार । २०/१०/२०२६

संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.)

विजयादशमीच्या सर्वांना शुभेच्छा...



दिव्यांग बांधवांना संजय गांधी समितीवर प्रतिनिधित्व देणार -आ. खताळ



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- दिव्यांग बांधवांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी त्यांना संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या समितीवर प्रतिनिधित्व देण्याचा प्रयत्न केला जाईल. दिव्यांग बांधवांच्या वतीने सुचविण्यात येणाऱ्या एका व्यक्तीला समितीवर शासकीय सदस्य म्हणून संधी देण्यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत. दिव्यांग बांधवांना शासकीय कार्यालयांमध्ये योजनांचा लाभ मिळविताना कोणत्याही प्रकारची अडवणूक किंवा अन्याय सहन करावा लागणार नाही, अशी ग्वाही आमदार अमोल खताळ यांनी दिली.

शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख रमेश काळे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यासह पठार भागातील हजारो कार्यकर्ते, महिला, तरुण आणि दिव्यांग बांधवांनी आमदार अमोल खताळ यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

व्यासपीठावर आदिशक्ती फाउंडेशनच्या अध्यक्षा नीलम खताळ, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख रमेश काळे, शहर प्रमुख विनोद सूर्यवंशी, युवासेना उपजिल्हाप्रमुख सौरभ देशमुख, तालुकाप्रमुख सुशील शेवाळे, नगरसेविका साक्षी सूर्यवंशी, सुनिता कुरकुटे, प्रवेशकर्ते विजय पानसरे, गणेश शेळके, प्रशांत फटांगरे, मच्छिंद्र सूर्यवंशी, बाळासाहेब माळी, सुनील सूर्यवंशी, सचिन शिंदे, संभाजी चव्हाण, मोहन चव्हाण, गोविंदचिमाजी शिंदे, किरण खांडरे, आवेश बेपारी, शांताराम गुंजाळ, गोविंद भरितकर, संजय गाडेकर, ताराचंद गुंजाळ, सुरेश ढोकरे, निलेश सातपुते, नंदाताई खेमनर, अजय धुळगंड, गोकुळ मेहेत्रे यांच्यासह असंख्य प्रवेशकर्ते उपस्थित होते.

आमदार खताळ म्हणाले, दिव्यांग बांधवांच्या प्रश्नांकडे विशेष लक्ष देण्याचे आश्वासन देतानाच सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी सोडविणे हेच आपले ध्येय आहे. तालुक्यातील संजय गांधी समितीचे अध्यक्ष म्हणून जबाबदारी स्वीकारल्यानंतर आपल्या कार्यकाळात दिव्यांग बांधवांची अनेक प्रकरणे मंजूर करून घेण्यासाठी प्रयत्न केले. रेशनकार्डसंदर्भातील अडचणी दूर करण्यासाठीही स्वतः पुढाकार घेतला. शासकीय योजनांचा लाभ मिळविताना दिव्यांग बांधवांना वारंवार कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागू नयेत, यासाठी प्रशासनाला आवश्यक सूचना दिल्या आहेत. यापुढेही त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्राधान्याने काम केले जाईल.

दिव्यांग बांधवांनी शिवसेनेत प्रवेश केला म्हणजे केवळ पक्षाची ताकद वाढली, एवढाच त्याचा अर्थ नाही. त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होऊन त्यांच्या प्रश्नांकडे सातत्याने लक्ष देण्याची जबाबदारीही वाढली आहे. दिव्यांग बांधवांच्या वतीने प्रतिनिधी निवडून त्यांना आवश्यक अधिकार आणि जबाबदारी देण्यासाठीही प्रयत्न केले जातील. निवडणुकीच्या काळात सामान्य कुटुंबांतील नागरिकांनी आपल्याला सहकार्य केले आहे. त्यामुळे त्यांच्या अडचणी आणि अपेक्षांची आपल्याला जाणीव आहे.

आदिवासी कुटुंबांतील मुलांच्या शिक्षणासाठी आवश्यक दाखले मिळवून देण्यासाठी आणि शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी नागरिकांनीही पुढाकार घ्यावा. शासकीय कार्यालयात कोणत्याही योजनेचा लाभ घेताना अडचण आल्यास शिवसेनेच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी संबंधित नागरिकांच्या मदतीला धावून जावे, असे आवाहन त्यांनी केले. दिव्यांग बांधवांना कोणी त्रास देत असेल किंवा योजनांचा लाभ मिळविताना अडवणूक करीत असेल, तर संबंधितांविरोधात आवाज उठविण्याची जबाबदारी शिवसैनिकांनी घ्यावी.

महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी बचत गटांच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. कुटुंबाच्या आर्थिक उन्नतीमध्ये महिलांचे योगदान वाढावे, यासाठी विविध योजनांची माहिती तळागाळातील महिलांपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. लाडकी बहीण योजनेच्या ई-केवायसी प्रक्रियेत काही महिलांकडून चुका झाल्यामुळे त्यांचा लाभ बंद झाल्याच्या तक्रारी आहेत. अशा महिलांना पुन्हा ई-केवायसी करण्याची संधी मिळावी, यासाठी शासनाकडे पाठपुरावा केला जाणार असल्याचे आमदार खताळ यांनी आश्वासन दिले.







झेंडू स्वस्त; शेतकऱ्यांना फटका !



संगमनेर - दसरा सणाला घर, कार्यालय, वाहनांना फुलांच्या माळा करण्यासाठी झेंडूच्या फुलांनाच मान आणि पसंती असते. केशरी, पिवळ्या रंगाचे झेंडू बाजारात मोठ्या प्रमाणावर विक्रीसाठी आले आहेत. दरवर्षी मोठ्या पावसामुळे शेतातच झेंडू खराब होतात, यंदा मात्र पाऊस कमी झाल्याने झेंडूच्या फुलांची आवक मोठ्या प्रमाणात झाली आहे. त्यामुळे या फुलांचे भाव देखील कोसळले आहे. या झेंडूला द होलसेल दर वीस ते तीस रुपये तर किरकोळ बाजारात प्रति किलो ४० ते ६० रुपयांपर्यंत खाली आहेत. त्यामुळे फुले उत्पादक शेतकऱ्यांना मोठा फटाका बसला आहे.







Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा

- अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
- माफक दरात - संगमनेर येथेच
- 105 बेड्स
- तज्ञ डॉक्टर्स
- अत्याधुनिक सुविधा

कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध

हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग

सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33

पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना

9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services